## स्थायी समिती
## दाखल विषय – दि. २८/५/२०१९

**विषय क्रमांक :– ७२ त्वर्य**

पुणे शहरातील निवासी मिळकतकरदाते व गवनि विभागाकडील सेवा शुल्क भरणाऱ्या कुटूंबासाठी पंडित दिनदयाळ उपाध्याय अपघात विमा योजना राबविणे ( टेंडर क्रं. ८४ सन २०१८– १९ ) कामी निविदा मागविली असता दि युनाएटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, स. नं. १०६/अे/८, शिवम कॉम्पेक्स, पहिला मजला शंकरमठाजवळ, पुणे सोलापूर रोड, हडपसर, पुणे – ४११ ०२८ यांची एकच निविदा आली असल्याने त्यांचेकडून प्रति व्यक्ती प्रिमियम रक्कम रूपये ७५/– ( १८% जीएसटी करासह वार्षिक ) X ६,७८,०९० निवासी मिळकत करदाते व गवनि विभागाकडील सेवाशुल्क करदात्यांकरीत रक्कम रूपये ५,०८,५६,७५०/– ( अक्षरी रक्कम रूपये पाच कोटी आठ लाख छपन्न हजार सातशे पन्नास फक्त ) प्रिमिअम स्वरूपात अदा करणेस व खालील नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर प्रिमियमची रक्कम खर्ची टाकणेस आणि करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/४४ दि. २८/५/२०१९ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०१९– २०२०
RE 17 F 206
पंडित दिनदयाळ उपाध्याय अपघात विमा योजना.
मान्य तरतूद रक्कम रूपये ७,००,००,०००/– पैकी रक्कम रूपये ५,०८,५६,७५०/–

**विषय क्रमांक :– ७३ त्वर्य**

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून सन २०१८– १९ या वर्षातील संचलन तुटीपोटी मागणी करण्यात आलेली पुणे महानगरपालिकेच्या हिश्श्याची ( ६०% ) रक्कम सन २०१९ –२०२० या वर्षात मासिक समान हप्त्यात अग्रीम स्वरूपात आदा करणेसाठी खालील बाबींस मान्यता मिळणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/४८ दि. २८/५/२०१९ चे पत्र.

१. पुणे महानगरपालिकेच्या सन २०१९–२० च्या अंदाजपत्रकात पीएमपीएमएल संस्थेस संचलन तूटीपोटी करण्यात आलेल्या तरतूदीमधून ( RE58A101A ) प्रतिमहा र. रू. १२ कोटी ११ मासिक समान हप्त्यात ( एप्रिल २०१९ ते फेब्रुवारी २०२० ) पुणे महानगरपालिकेकडून पीएमपीएमएल संस्थेस आदा करणेस,

२. पुणे महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरीक्षक विभागाकडून पीएमपीएमएलच्या सन २०१८– २०१९ च्या ताळेबंदाचे लेखापरिक्षण झालेनंतर, ताळेबंदानुसार निश्चित झालेली कमी/अधिक रक्कम आदा करणेस,

३. मा. महापालिका आयुक्त ठ. क्र. ६/२५, दि. १२/०४/२०१९, मा. महापालिका आयुक्त ठ. क्र. ६/६२, दि. १४/०५/२०१९ व मा. महापालिका आयुक्त ठ. क्र. ६/९३, दि. २४/०५/२०१९ चे मान्यतेनुसार अग्रीम स्वरूपात आदा करणेत आलेले माहे एप्रिल ते जुलै २०१९ पर्यंतचे संचलन तुटीपोटी आदा करण्यात आलेले प्रतिमहा र. रू. १२ कोटी प्रमाणे पीएमपीएमएल संस्थेस आदा करण्यात आलेले र. रू. ४८ कोटी खर्चास पश्चात मान्यता मिळणेस,

**विषय क्रमांक :– ७४ त्वर्य**

कै. सहादू गोमाजी सुपे, या मयत सेवकाच्या जागेवर त्यांचा वारस मुलगा श्री. निखिल सहादू सुपे यांची नगरसचिव कार्यालयाकडे लिपिक टंकलेखक या पदावर नेमणूक करण्यास मा. अति. महा. आयुक्त (इ) यांनी संदर्भ क्र. १० च्या ठरावान्वये मान्यता दिलेली आहे. प्रस्तुत अनुकंपा तत्वावरील वारस प्रकरणी मा. अति.महा. आयुक्त यांचा चौकशी अहवाल व इतर सर्व आवश्यक ती कागदपत्रांची पूर्तता कै. सहादू गोमाजी सुपे, यांच्या कायदेशीर वारसाने केलेली आहे. व मा. अति. महा.आयुक्त (इ) यांनी संदर्भ क्र. १० ,११ व १५ अन्वये मान्यता दिल्यानुसार खालील सेवकाची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३(२) अन्वये नगरसचिव कार्यालयाकडे अनुकंपा तत्वावर लिपिक टंकलेखक या पदावर हंगामी नेमणूक करण्यास मान्यता देण्याबाबत **मा. नगरसचिव यांचे जा. क्र. नसजा/४७१, दि. २८/५/२०१९ चे पत्र.**

| अ.क्र. | सेवकाचे नाव | पदनाम व वेतनश्रेणी | शेरा |
|---|---|---|---|
| १. | श्री.निखिल सहादू सुपे (अ.ज) | लिपिक – टंकलेखक (वे.श्रे.५२००ते२०२००+ग्रे.पे.२९००+ स्पे.पे.१८००+मान्य भत्ते) | नगरसचिव कार्यालयाकडील अ.ज गटाच्या रिक्त असलेल्या जागेवर अनुकंपा तत्वावर हंगामी नेमणूक करण्यास |

**विषय क्रमांक :– ७५ त्वर्य**

मा. दिपक पोटे व मा. हेमंत रासने यांचे दि. २८/५/२०१९ चे पत्र

बाणेर स. नं. ८२ ( भाग ) येथे बाणेर मुख्य रस्त्यालगत श्रीराम हाईटस् या इमारतीच्या लगत सुमारे २९० मी. लांबीचा रस्ता आहे. सदर रस्त्याच्या दोन्ही बाजुस पुर्व मान्य विकसन झालेले असून हा रस्ता सार्वजनिक वापराचा आहे. या रस्त्यालगतच्या सर्व मिळकतींना बाणेर रस्त्यास जाण्या–येण्यासाठी एकमेव प्रवेशमार्ग आहे. बाणेर मुख्य रस्त्यापासून

सुमारे १०० मी. अंतरापर्यत हा अंतर्गत रस्ता ६.०० मी. लांबीचा आहे. सदर सार्वजनिक रस्ता अस्तित्वातील इमारतींचा विचार करता वाहतुकीस अपुरा पडत आहे.

सबब बाणेर स. नं. ८२ ( भाग ) येथील श्रीराम हाईटस् पासून दक्षिणेकडे जाणारा अस्तित्वातील ६.०० मी. सार्वजनिक रस्ता, दोन्ही बाजुस प्रत्येकी १.५० मी. याप्रमाणे एकूण ९.०० मी. रूंदीचा करणेसाठी महाराष्ट्र प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २१० अंतर्गत रूंदीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– ७६ त्वर्य**

प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत परवडणारी घरे या कारणासाठी, पुणे महापालिका कार्यक्षेत्रामध्ये, निविदा क्र. १०.२०१८. CONSTRUCTION OF AFFORDABLE HOUSING PROJECT OF 1199 EWS TENEMENTS + 462.02 Sq.m. OF REFUGEAREA UNDER PRADHAN MANTRI AWAS YOJANA (U) AT WADGAON (KH) ON LAND BEARING S. NO. 39 HISSA NO. 2A/1, 2A/1B/2, 2B/1/3, 2B/1/4, 2B/1 S. NO. 40 Hissa No. 1/4, 1/5, 2/1 and 1/6, PUNE या कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार VASCON ENGINEERS LTD. यांचे एकच टेंडर आले ( टेंडर र. रू. १०४,४७,२६,३८२/– ( वस्तू व सेवा कर वगळून ) पेक्षा ०.५% कमी (स्वेच्छांपत्र ) ) असल्याने त्यांचेकडून र. रू. १०३,९५,०२,७५०/– ( रक्कम रूपये एकशे तीन कोटी पंच्चानव लाख दोन हजार सातशे पन्नास फक्त ) अधिक देय वस्तू व सेवा कर तसेच टेंडर अटी व शर्ती नुसार सर्वसाधार भाववाढ ( price variation clause ) सुत्रानुसार व डांबर, सिमेंट व स्टील या विशेष भाववाढ (star rate ) सुत्रानुसार फरक अदा/कपात करणे कामी व त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/PMAY/४३ दि. २८/५/२०१९ चे पत्र.

**विषय क्रमांक :– ७७ त्वर्य**

पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक शाळांमध्ये शिक्षण घेत असणाऱ्या इ.९वी आणि १० वीच्या विद्यार्थ्यांना मराठी, उर्दू व इंग्रजी माध्यमाची व पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील रात्रशाळेतील शिक्षण घेणा–या इ.९वी आणि १० वी च्या विद्यार्थ्यांना मराठी माध्यमाची क्रमिक पुस्तके देण्यासाठी खालील तक्त्यात नमूद केलेली इ. ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी एकूण ९४३५२ क्रमिक पुस्तके एकमेव शासकीय उत्पादित संस्था महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ पुणे यांचेकडून टेंडर न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील शेड्यूल चाप्टर ५(२)२ अन्वये खरेदी करणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा. अति. महा आयुक्त ( ज ) यांचे जा.क्र. मआ/इओ/४५ दि. २८/५/२०१९ चे पत्र.

१) दिनांक ५ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयानुसार विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तुस्वरुपात मिळाणाऱ्या लाभाचे हस्तांतर, रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात करणेबाबतचे आदेश प्राप्त झाले आहेत.तथापी राज्यप्रकल्प संचालक म.प्रा.शि.प.मुंबई यांचे दि. १८/०३/२०१७ चे पत्रानुसार सन २०१८–१९ पासून मोफत पाठ्यपुस्तके योजनेचा निधी विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करावयाचे आहे. मात्र सन २०१७–१८ प्रमाणे सन २०१९–२० मध्ये क्रमिक पुस्तके खरेदी करणेबाबत सूचित केले आहे.

   सन २०१८–१९ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना शासकीय उत्पादित संस्था महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ पुणे यांचेकडून टेंडर न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील शेड्यूल चाप्टर ५(२)२ अन्वये खरेदी करणेत आली. त्याप्रमाणेच सन २०१९–२० मध्ये पुणे महानगरपालिका संचलित मराठी, उर्दू व इंग्रजी माध्यमाच्या व पुणे महानगरपालिका हद्दीतील रात्रशाळेमधील माध्यमिक शाळांमधील इ. ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी माध्यमिक शाळांकडील इयत्ता ९वी व १०वी च्या विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके देणेस..

२) सन २०१९–२० या शैक्षणिक वर्षात पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक शाळांकडील शिक्षण घेणाऱ्या इ. ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी मराठी, उर्दू व इंग्रजी माध्यमाची व पुणे महानगरपालिका हद्दीतील रात्रशाळेमधील माध्यमिक शाळांमधील इ. ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी क्रमिक पुस्तके खरेदी करणेस..

३) इ. ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी एकूण ९४३५२ क्रमिक पुस्तके एकमेव शासकीय उत्पादित संस्था असलेल्या मा.भांडार व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ,बालभारती पुणे यांचेकडून टेंडर न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील शेड्यूल चाप्टर ५(२)२ अन्वये खरेदी करणेस..

४) त्यासाठी येणाऱ्या र.रु.४८,९३,५५५/–(अक्षरी अठ्ठेचाळीस लाख त्रान्नव हजार पाचशे पंचाव्वन फक्त ) खर्चाची रक्कम मा.संचालक पाठ्यपुस्तक मंडळ पुणे (बँक महाराष्ट्र खाते नंबर २०००९००००३, आयएफएससी कोड MAHB०००१२६१) यांचे नावे आरटीजीएसने जमा करणेस..

५) विद्यार्थी संख्येत काही प्रमाणात वाढ झाल्यास मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे अधिकारात पुनःश्च क्रमिक पुस्तके खेरदी करणेस..

**पुणे महानगरपालिका संचलित माध्यमिक शाळांमधील इ. ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी खालीलप्रमाणे क्रमिक पुस्तकांची आवश्यकता आहे.**

| **माध्यम** | **इयत्ता ९ वी** | **इयत्ता १० वी** | **एकूण** |
|---|---|---|---|
| मराठी | २७६४७ | २५५९१ | ५३२३८ |
| उर्दू | ६२०९ | ६६१२ | १२८२१ |
| इंग्रजी | १३९८८ | ११८०५ | २५७९३ |
| एकूण | ४७८४४ | ४४००८ | ९१८५२ |

**पुणे महानगरपालिका हद्दीतील रात्रशाळेमधील माध्यमिक शाळांमधील इ. ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी खालीलप्रमाणे क्रमिक पुस्तकांची आवश्यकता आहे.**

| **माध्यम** | **इयत्ता ९ वी** | **इयत्ता १० वी** | **एकूण** |
|---|---|---|---|
| मराठी | १५४० | ९६० | २५०० |

**विषय क्रमांक :– ७८ त्वर्य**

पुणे पेठ सदाशिव स. नं. ७२१/२ अ, प्लॉट नं. ९८७ अ इंदुलाल कॉम्प्लेक्स येथील तिसऱ्या मजल्यावरील गाळा क्र. ३१४ बाबत मा.धीरज घाटे व मा. प्रकाश ढोरे यांचे दिनांक ११/१२/२०१८ चे पत्रावर झालेला मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. ३३० दि.१०/१/२०१९ ला अनुसरुन झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २२५२ दि. १८/२/२०१९ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/माव्य/१४०१ दि.१८/२/२०१९ ने पाठविलेला अभिप्रायावर झालेला मा. स्थायी समिती ठराव क्र. २६६६, दि. २७/२/२०१९ ला अनुसरुन मुख्य अभियंता पाणी पुरवठा विभाग यांचेकडील पत्र, इकडील आवक क्र. १४४१, दि. २७/५/२०१९ ला अनुसरुन मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/४७ दि. २८/५/२०१९ ने पाठविलेला फेर अभिप्राय विचारासाठी.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**